# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०४/२०२४ (सोमवार) दुपार**


---

## पोलीस स्टेशन कुही हद्दीत दारू तस्करावर नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

पोस्टे. कुही हद्दीतील पांडेगाव ते कुही रोडवरील एकवीरा नगर परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध्य मोहफुलाचा दारूची वाहतुक होत असल्याची गोपनिय माहीती कुही पोलीसांना मिळाल्याने दिनांक ३१/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथिल अधिकारी व स्टाफसह वरिष्ठांना माहीती देवुन मा. दिपक अग्रवाल सा. भापोसे सहा. पोलीस अधिक्षक तथा ठाणे प्रभारी यांचे नेतृत्वात एकवीरा नगर शिवारात जावुन कुही पांडेगाव रोडवर नाकांबदी करून वाहने चेक करीत असतांना दरम्यान मो. सा. क्र. एम. एच. ३६/ए के– ८७७१ चा चालक नामे– अक्षय मनोज घरडे, रा. फुलमोगरा अशोक नगर शहापूर भंडारा याला ताब्यात घेवुन याच्या ताब्यातुन दोन रबर टयुबमध्ये प्रति टयुब २० लिटर प्रमाणे ४० लिटर मोहाफुल गावठी दारू प्रति लिटर ५०रू. प्रमाणे २०००/–रू व वाहतुकीसाठी वापरलेले वाहन किमती ८०,०००/–रू. असा एकुण ८२,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करूण पुढील कार्यवाही करण्यात आली.

कार्यवाही पथक मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार सर भापोसे तसेच अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार IPS मा. दिपक अग्रवाल सा. सहा. पोलीस अधिक्षक पोस्टे कुही याच्या नेतृत्वात पोउपनि स्वप्नील गोपाले, पोहवा ओमप्रकाश रेहपाडे, पो. शि. अनिल करडखेले यांनी यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.




# अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

**पो.स्टे. काटोल** :— दिनांक ३०/०३/२०२४ चे २३.०० वा. ते २३.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन काटोल येथील स्टाफ पेट्रोलिंग करित असताना गोपनीय माहिती मिळाली की, काटोल येथील अर्जुननगर येथे आरोपी आकाश नंदकिशोर पाटमासे रा. अर्जुन नगर काटोल हा फिर्यादी मुकेश दिनेश पराये यांचे घरासमोर हातात एक लोखंडी काळसर तलवार घेवुन फिरत होता. आरोपीस काटोल पोलीसांनी ताब्यात घेवुन आरोपीच्या ताब्यातुन एक लोखंडी काळसर तलवार ज्याचा टोकापासुन मुठापर्यंत २३ इंच लांब व मुठ ०५ इंच लांब अशी मुठी पासुन टोकापर्यत २३ इंच लांब व पायथ्याशी १.५ तसेच मुठीची रूंदी ०१ इंच एका बाजुने धारधार असलेली किंमती १००/— रू वर्णनाची तलवार घटनास्थळी जप्त करण्यात आली. आरोपीविरूद्ध पोस्टे काटोल येथे कलम ४, २५ शस्त्र अधि १९५९ महाराष्ट्र पोलिस अधि. १९५१ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, पोहवा कैलास उईके, प्रभुदास दलाल, पोशि दशरथ पवार, चालक योगेश पराची यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर